# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मौजे पुसद (जि.यवतमाळ) येथील शासकीय जमिनीवर विहिर मंजुर करुन खोदकामाच्या अनुदानाचा अपहार केल्याबाबत**

**(१) २४५६९ (१४-०८-२०१५). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पुसद (जि.यवतमाळ) येथील सावरगांव (बंगला) मध्ये शासकीय जमिनीवर मनरेगा अंतर्गत विहीर मंजुर करुन खोदकामाचे अनुदान घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणास सहा महिने उलटूनही याबाबत कोणतीही कार्यवाही शासनाने केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सावरगांव बंगला येथील श्री.रुपा राठोड व इतरांच्या शेतात शासकीय योजनेतून विहीर मंजूर झालेल्या जागे ऐवजी विहिर शासकीय जमीनीवर खोदण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१४-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) शासकीय जमिनीवर करण्यात आलेले ६६% भागावरील खोदकाम बुजविण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. तसेच सचिव ग्रामपंचायत सावरगाव (बंगला), माजी सचिव, तलाठी, सरपंच ग्रामपंचायत सावरगाव तांत्रिक अधिकारी (नरेगा), सहायक कार्यक्रम अधिकारी, यांचे उपस्थितीत संयुक्त मोका पाहणी अहवालानुसार श्री.रुपा रत्ना राठोड, यांनी त्यांच्या स्वमालकीच्या शेतात मग्रारोहयो अंतर्गत मंजूर असलेल्या विहीरीचे खोदकाम स्वखर्चाने मोजमाप पुस्तीकेत नोंदविलेल्या मोजमापानुसार पूर्ण केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील गगनबावडा तालुका पर्यटन तालुका म्हणून जाहिर करण्याबाबत

**(२) ६८१४८ (२७-०१-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील गगनबावडा तालुक्यामध्ये ऐतिहासिक आणि प्राचीन ठिकाणे अनेक पुरातन मंदीरे, मोठया प्रमाणात पडणारा पाऊस, कोदे, लखमापूर, वेसरफ, अणदूर येथील धरणे, औषधी वनस्पतीने समृध्द दऱ्या-खोऱ्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गगनबावडा तालुका हा ३९ महसूली गांवे व वाडया-वस्त्यांनी विखूरलेला अविकसीत व डोंगराळ तालुका आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गगनबावडा तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गगनबावडा तालुका पर्यटन तालुका म्हणून जाहिर करण्याबाबत निवेदने व पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, गगनबावडा तालुका पर्यटन तालुका म्हणून जाहिर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०२-२०१८) :** (१), (२) व (३) होय.

(४) प्रश्नोक्त आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) व (६)प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील देपोली येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेची झालेली दुरवस्था

**(३) ६९८८४ (२७-०१-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील देपोली येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेची दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोडकळीत आलेल्या इमारतीमध्ये शाळेचे वर्ग भरतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंचायत समिती शिक्षण विभाग व सर्व शिक्षा अभियान यांच्याकडे तक्रारी करुनही दुर्लक्ष केले जात असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०२-२०१८) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.
भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील देपोली येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांच्या २ वर्ग खोल्यांपैकी एक वर्ग खोलीचे पत्रे उडून गेली आहेत. सुरक्षित असलेल्या एका वर्ग खोलीत वर्ग भरवण्यात येत आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) नाही.
जिल्हा नियोजन समिती, ठाणे यांनी सन २०१७-१८ मध्ये जिल्हा परिषद शाळा दुरुस्तीकरिता रु.५६२५६९/- इतक्या निधीची तरतूद केली आहे. त्यानूसर विशेष दुरुस्तीसाठी प्रशासकीय मान्यता दि.१६.०६.२०१७ रोजी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आरे कॉलनी परजापूर पाडा, मुंबई येथील नैसर्गिक तलावाचे भुमिपूजन होऊनही काम सुरु न झाल्याबाबत**

**(४) ७२१७२ (२७-०१-२०१७). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरे कॉलनी परजापूर पाडा, मुंबई येथील नैसर्गिक तलावाचे संवर्धन व सुशोभीकरण करण्याचा प्रस्ताव सन २०१४ रोजी मंजूर झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या पर्यटन विभागामार्फत दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ रोजी मा.मंत्री महोदयांच्या उपस्थितीत सदर कामाचे भूमिपूजन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर काम आजपर्यंत सुरु न झाल्यामुळे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुधारित आदेश काढण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर सुधारित आदेश काढल्यानंतर महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी सदर काम सुरु करणे अपेक्षित होते परंतु ते सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर काम त्वरित सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०२-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४), (५) व (६) सुधारित आदेश प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम सुरु करण्यात आले आहे.

---

**गडचिरोली जिल्हा परिषदेने नक्षलग्रस्त आदिवासी गावांचा विकास व गोटुलचे बांधकाम करण्यासाठी निधी देण्याबाबत**

**(५) ७२२७३ (२७-०१-२०१७). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हा परिषदेने नक्षलग्रस्त आदिवासी गावांचा विकास करण्यास व करमणुकीचे साधन असलेल्या गोटुलचे बांधकामास सन २०१५-१६ मध्ये निधीची तरतुद करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गोटुल बांधकाम निधीमध्ये कोणकोणत्या गावांमध्ये गोटुलचे बांधकामाचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले,

(३) असल्यास, आतापर्यंत किती गोटुलचे प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात करण्यात आलेली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी विशेष कृती कार्यक्रम या नियोजन विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजनेंतर्गत जिल्हा नियोजन समिती, गडचिरोली यांचेमार्फत मौजे ताडगुडा, परसलगोंदी, मंगेर ता.एटापल्ली तसेच मौजे कोसमी नं.१ ता.धानोरा या ४ गावांमध्ये गोटुल बांधकामांना एकूण रु. ३४.०० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

(३) मौजे ताडगुडा, परसलगोंदी, मंगेर ता.एटापल्ली तसेच मौजे कोसमी नं.१ ता.धानोरा या ४ गावांमधील गोटुल बांधकामे पूर्ण झालेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सर्जेकोट मिऱ्याबांदा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीतंर्गत असलेल्या सर्जेकोट-पिरावाडी रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत**

**(६) ७६६३३ (१५-०४-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्जेकोट मि-याबांदा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायती अंतर्गत असलेल्या सर्जेकोट-पिरावाडी रस्ता, हा रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ ग्रामीण रस्ता क्र.२४० असून सदरहू रस्त्यांच्या एकूण लांबीपैकी सुमारे ४०० हून अधिक मीटर अंतराच्या रस्त्यावर अतिक्रमण करण्यात आलेले असून सदरहू अतिक्रमण हटविण्यात यावे यासाठी ५ वर्षापासून सातत्याने मा.ग्रामविकास मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग आदीकडे तेथील नागरीकांनी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरहू रस्त्यावरील अतिक्रमणे विनाविलंब हटवून रस्त्याचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनातून उपलब्ध निधी व निकषास अधीन राहून टप्प्याटप्प्याने काम

करण्यात येईल असे लोकप्रतिनिधींना लेखी पत्राद्वारे यापूर्वी कळविण्यात आलेले असतानाही आजपर्यंत सदरहू रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविण्यात आले नाही व रस्त्यांचे रूंदीकरण व डांबरीकरण इत्यादी कामे करण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू रस्त्यावरील अतिक्रमणे हटवून रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) जिल्हा परिषदेमार्फत रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.
(४) प्रश्नांकित सर्जेकोट पिरावाडी रस्ता ग्रामीण मार्ग क्र.२४० दर्जाचा असून त्याची एकूण लांबी १.०० कि.मी. आहे. एकूण लांबीपैकी ०/०० ते ०/४०० कि.मी. लांबीचा रस्ता अस्तित्वात असून तो डांबरी पृष्ठभागाचा आहे.

जिल्हा परिषदेने दिलेल्या अद्ययावत माहितीनुसार उर्वरीत रस्त्यावर अतिक्रमण झालेले नसून ०/४०० ते ०/५१५ कि.मी. भागामध्ये रस्त्याची रुंदी २.०० मीटर व ०/५१५ ते १/०० कि.मी. भागामध्ये रस्त्याची रुंदी ३.०० मीटर असल्याचे ग्रामपंचायत नमुना नं.२३ वरुन आढळून येते. सदर रस्त्याची रुंदी डांबरीकरण करण्यासाठी पुरेशी नसल्याने रस्त्यासाठी जागा कमीत कमी ४.०० मीटर रुंदीने उपलब्ध करुन देण्याबाबत सरपंच, ग्रामपंचायत यांना जिल्हा परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे.

ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करुन दिल्यास सदर काम जिल्हा वार्षिक योजन/ रस्ते विशेष दुरुस्ती इ. कार्यक्रमामधून निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना राबविण्याचा घेतलेला निर्णय

**(७) ७७९४३ (१९-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना राबविण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, या योजनेचे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या व केंद्र शासनाकडून व्याज अनुदान प्राप्त झालेल्या पात्र महिला स्वयं सहाय्यता समुहांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) योजनेची अंमलबजावणी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात येत आहे. त्यास अनुसरुन या योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शक सूचना दिनांक १६ जानेवारी, २०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना पाठविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार या मार्गदर्शन सूचनांचे सामुहिक वाचन करण्यास व या योजनेची संपूर्ण माहिती महिला स्वयं सहाय्यता समुहांना देण्याबाबत सर्व जिल्हयांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक १० जानेवारी, २०१७ पर्यंत ४,६६२ महिला स्वयं सहाय्यता समूहांना रु.१.५३ कोटी एवढे व्याज अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयातील कोपर्डी येथे शाळेसाठी जागा देण्याबाबत**

**(८) ७९४९७ (१५-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील कोपर्डी येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार आणि खुनाची घटना घडल्यानंतर भैय्यूजी महाराज प्रणित श्री.सदगुरु दत्त धार्मिक आणि परमार्थिक ट्रस्टच्या वतीने गावात शाळा सुरु करण्यासाठी दोन एकर जागा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी ग्रामपंचायतीकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांच्या जवळ ग्रामपंचायतीच्या मालकीची किंवा शासकीय जागा उपलब्ध नसल्याने शाळेस अद्याप जागा दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावाजवळ शाळा सुरु करण्यासाठी तातडीने जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०२-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

कोपर्डी गावात शाळा सुरु करण्यासाठी भैय्युजी महाराज प्रणित श्री.सदगुरु दत्त धार्मिक आणि परमार्थिक ट्रस्टच्या वतीने ग्रामपंचायतीकडे जागा मिळणेबाबत लेखी अर्ज सादर केलेला नाही. त्यामुळे त्याबाबत पुढील कार्यवाही करता आली नाही.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील पर्यटनाला पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(९) ८३७४० (१९-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हेलिकॉप्टरमधून मुंबई दर्शन, सी प्लेन, समुद्रात पंचतारांकित हॉटेल असे प्रकल्प महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून मुंबईतील पर्यटनाला चालना मिळण्यासाठी सुरु करण्याचा निर्णय होवून वर्ष उलटले तरी अद्यापी पायाभूत सुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील पर्यटनाला पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०२-२०१८) :** (१) हेलिकॉप्टरमधून मुंबई दर्शन ही सेवा खाजगी उद्योजकामार्फत जानेवारी, २०१६ मध्ये पर्यटकांसाठी चालू करण्यात आली होती. परंतु, एका अपघातामुळे पर्यटकांची संख्या कमी झाल्याने ही सेवा बंद करण्यात आली. सदर सेवा पुन्हा सुरु करण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत.

राज्यात भूजल विमान सेवा (सी प्लेन) सुरु करण्यासाठी या क्षेत्रातील व्यावसायिक संस्थेशी करारनामा केलेला असून जागा उपलब्धता व विविध परवानग्या प्राप्त करुन घेण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

समुद्रात हॉटेल (फ्लोटेल प्रकल्प-तरंगते उपाहारगृह) करिता तात्पुरती जेट्टी उभारण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने परवानगी नाकारलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या पदोन्नती व वेतनवाढीमध्ये झालेला गैरकारभार**

**(१०) ८७२०८ (११-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या कामकाजासाठी एमएस-सीआयटीचे प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले असतांना सदरचे प्रशिक्षण व प्रमाणपत्र न घेताच पदोन्नतीचा व वेतनवाढीचा लाभ घेतल्या प्रकरणी सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, चौकशीनुसार संबधित अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून लाभाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०२-२०१८) :** (१) होय.
(२) ज्या कर्मचाऱ्यांनी विहित मुदतीत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केले नाही त्यांना अतिप्रदान झालेल्या रकमेची वसुली जिल्हा परिषद स्तरावर चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात दुष्काळी गावांचा विकास मनरेगाच्या माध्यमातून विविध फळपिकांची लागवड करण्याबाबत**

**(११) ८८९७४ (२१-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात दुष्काळी गावांचा विकास मनरेगाच्या माध्यमातून विविध फळपिकांची लागवड करुन होऊ शकतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांनी मनरेगाच्या माध्यमातून फळपिकांची लागवड करावी यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्याबाबत शासन विचाराधीन असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१६-०२-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) शासन निर्णय क्रमांक मग्रारोहयो २०१६/प्र.क्र.८५/मग्रारो-१, दि.१.१०.२०१६ अन्वये समृध्द जनकल्याण योजना सन-२०१६-१७ व २०१७-१८ मध्ये प्रभावीपणे राबविण्याबाबतच्या सूचना क्षेत्रीय स्तरावर देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेततळयाच्या अनुदानात भरीव वाढ करण्याबाबत**

**(१२) ८९००८ (११-०८-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २०१६ मध्ये पाच वर्षात राज्यात ५ लाख शेततळी बांधणार अशी घोषणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात माहे मे, २०१७ पर्यत फक्त ५२१० शेततळी बांधण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, शेतात शेततळी बांधण्यासाठी शासनाकडून देण्यात येणारे अनुदानही कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने शेतक-यांना प्रोत्साहित करण्यासह शेततळयाच्या अनुदानात भरीव वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०२-२०१८) :** (१) व (२) "मागेल त्याला शेततळे" ही योजना राज्यात शासनाच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ व दि.१० ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत १,११,१११ इतकी शेततळी बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. माहे मे, २०१७ अखेर ३६,२९४ शेततळे पूर्ण झाली असून, ११५३० कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) "मागेल त्याला शेततळे" योजनेअंतर्गत व विविध आकारमानानुसार कमाल रु.५०,०००/- इतके अनुदान देय आहे.सदर योजना अनुदान तत्वावर आधारीत आहे. त्यानुसार राज्यात सद्य:स्थितीत ५४,५२३ शेततळी पूर्ण झाले असून ५५३३ कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि नाशिक) येथे विमुक्त जाती-भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींकरिता स्वतंत्र वसतिगृहे बांधण्याबाबत**

**(१३) ८९१७७ (१६-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि नाशिक) येथे विमुक्त जाती - भटक्या जमाती , इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी आणि विद्यार्थीनींकरिता स्वतंत्र वसतिगृहे बांधण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२०-०२-२०१८) :** (१) होय.

(२) राज्यातील प्रत्येक जिल्हयात मुले व मुलींसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे ७२ वसतीगृहे सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌ववत नाही.

---

**गोवर्धन (जि.नाशिक) येथील कलाग्रामचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत**

***(१४) ८९१८१ (११-०८-२०१७).*** **श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवर्धन (जि.नाशिक) येथील कलाग्रामचे बांधकाम गेल्या वर्षभरापासून बंद पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारत विनावापर पडून राहू नये म्हणून इमारत पूर्ण होण्याआधी दिल्ली हाटच्या धर्तीवर विविध राज्यांशी करार करुन येथे लोककला विक्री प्रदर्शन सुरु करण्यासाठी कलाग्रामचे एक्झेक्युशन प्लॅन तयार करावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कलाग्रामचे बंद पडलेले काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०२-२०१८) :** (१) नाही.

(२) अंशतः खरे आहे. मा.लोकप्रतिनिधींनी अशी मागणी दि.२७/८/२०१६ च्या पत्रान्वये केली आहे.

(३) सदर प्रकल्पासाठी उपलब्ध झालेला निधी व प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामाच्या वावानुसार प्रकल्पाची स्थापत्य कामे पूर्ण करण्यात आली आहेत. हा प्रकल्प P.P.P. तत्वावर कार्यान्वित होण्यासाठी महामंडळामार्फत कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील जातेगांव या गावाला जोड निधी मिळण्याबाबत**

***(१५) ८९४५१ (१८-०८-२०१७).*** **श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगांव तालुक्यातील जातेगांव या गावाची आमदार आदर्श गांव योजने अंतर्गत निवड करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदर्श ग्राम योजना राबविण्याच्या ग्राम विकास विभाग शासन निर्णयानुसार आमदार निधीतुन जातेगांव गावामध्ये पाण्याची टाकी व सिमेंट कॉंक्रीट बंधाऱ्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे परंतु शासनाकडून अद्याप जोड निधी सदर गावाला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार उपरोक्त आमदार आदर्श गावाला शासनाकडून जोड निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शासनाकडून ४ कोटी निधी आमदार आदर्श ग्राम योजनेसाठी जोडनिधी म्हणून प्राप्त झालेला आहे. सांसद आदर्श ग्राम योजना व आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत गठीत करण्यात आलेल्या शक्ती प्रदत्त समितीची बैठक मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने या संदर्भातील प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे. या संदर्भात निर्णय झाल्यावर निधी वितरीत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील ४० जिल्हा परिषद शाळांच्या इमारती धोकादायक असल्याबाबत**

**(१६) ८९७५५ (११-०८-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडया (जि.पालघर) तालुक्यात ४० हून अधिक जिल्हा परिषद शाळांच्या इमारती अत्यंत धोकादायक असल्याचे दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार शाळाच्या इमारतीची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०२-२०१८) :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मोखाडा तालुक्यात जिल्हा परिषद २० शाळांच्या इमारती धोकादायक असल्याने सदर शाळांच्या इमारती निर्लेखन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

जिल्हा नियोजन समितीने सन २०१७-१८ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या विशेष दुरुस्तीसाठी रु.५२५.०० लक्ष इतका निधी मंजूर असून शाळा दुरुस्तीच्या कामाची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरेड (जि.नागपूर) तालुक्यातील झुडपी जंगलाची जमिन ग्रामपंचायत सचिवाने कंत्राटदाराला बेकायदेशीरपणे दिल्याबाबत**

**(१७) ८९८८५ (२२-०८-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (जि.नागपूर) तालुक्यातील गट ग्रामपंचायत, निरव्हा येथे पंचायत समिती,उमरेड अंतर्गत झुडपी जंगलाची जमिन ग्रामपंचायत सचिवाने कंत्राटदाराला विनापरवाना भाडयाने दिल्याने वनसंपत्तीचे नुकसान झाले असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुराढोरांच्या चराईकरीता राखीव असलेली जमिन कंत्राटदाराला देण्यात आली असून सदर झुडपी जंगलातील तेंदु वृक्ष, निलगिरी वृक्ष व इतर झाडे कंत्राटदारानी अवैधरित्या नष्ट केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार ग्रामपंचायत सचिव व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०२-२०१८) :** (१) होय.

दि. १/३/२०१७ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीस अनुसरून दि. ३/५/२०१७ रोजी प्राप्त झालेल्या चौकशी अहवालास अनुसरून ही बाब निदर्शनास आली आहे.

(२) गट ग्रामपंचायत, निरव्हा यांनी मासिक सभा दि. २७/०३/२०१५ ठराव क्र. ७ नुसार ग्रामपंचायतीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून प.ह.नं. २० अ, भू.क्र.२२७ आराजी ४३.२३ हे. आर जमीन ५ ते १५ वर्षाकरीता झुडपी जंगलाची जमीन कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची परवानगी प्राप्त नसताना ग्रामपंचायत, सरपंच व सचिव यांनी उक्त कंत्राटदाराला भाडयाने दिल्याचे दिसून आले आहे.

सदर कंत्राटदाराने ठेका दिल्यानंतर झुडपी जंगलातील लहान झुडपे काढून जमीन साफ केल्याचे दिसून आले आहे. मात्र जंगलामधील कोणत्याही मोठया झाडांची तोड झाली नसल्याचे आढळून आले. सदर झुडपांची कटाई सुरू असतांना गावक-यांनी ठेकेदारास विरोध केल्यामुळे ठेकेदाराने सदर जमिनीवर इतर कोणतेही काम केलेले नसल्याचे दिसून येते. त्यानंतर ग्रामपंचायत निरव्हाने साफ केलेल्या जागेवर मनरेगा योजनेतून विविध प्रकारची उदा. सप्तपर्णी, कडुनिंब, तेंदू, निलगिरी, कॅशीया इत्यादी २८०० झाडांची लागवड केल्याचे दिसून आले आहे.

(३) या प्रकरणी ग्रामपंचायत निरव्हा येथील सरपंच व सचिव यांनी झुडपी जंगलाची जमीन कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची परवानगी प्राप्त नसताना भाडयाने दिली ही बाब नियमबाहय असल्याने श्री. पी. यु. बोराडे तत्कालीन सचिव ग्रामपंचायत निरव्हा यांचे विरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. तसेच, सरपंच ग्रामपंचायत निरव्हा यांचे विरूध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९(१) नुसार कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे दि. १६/१२/२०१७ रोजी सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___

**जालना जिल्हयातील सुमारे १३५० ग्रामपंचायत कार्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी वेतनापासून वंचित असल्याबाबत**

**(१८) ९०५६८ (१८-०८-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील सुमारे १३५० ग्रामपंचायत कार्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी वेतनापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार सदर कर्मचाऱ्यांना तात्काळ वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०२-२०१८) :** (१) नाही. हे खरे नाही.

(२) व (३) जालना जिल्हयामध्ये एकूण ७७९ ग्रामपंचायती असुन त्यामध्ये एकूण १४२८ ग्रामपंचायत कर्मचारी कार्यरत आहेत. सदर ग्रामपंचायत कर्मचा-यांना माहे जून, २०१७ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले आहे.

शासन निर्णय दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ अन्वये जुलै, २०१७ ते सप्टेंबर, २०१७ अखेरचे ग्रामपंचायतीचे वेतन अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले असून, याबाबतच्या वितरणाची कार्यवाही गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

(४) नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील ९८ शाळांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(१९) ९०५९१ (११-०८-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील ९८ जिल्हा परिषद शाळांची दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला जिल्हा नियोजन समितीकडून शाळांच्या खोल्या दुरुस्तीकरिता १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे परंतु सदरहू प्रस्ताव प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांना गळक्या शाळांत बसावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर शाळांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सन २०१७-१८ करीता जिल्हा परिषदेच्या ११६ शाळेच्या २२० वर्ग खोल्यांची दुरुस्तीचे नियोजन करण्यात आले आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा नियोजन समितीने सन २०१७-१८ करीता १००.०० लक्ष इतका निधी मंजूर केला असून शाळा दुरुस्तीचे दायित्व सुमारे रु.२४७ लक्ष इतका असल्याने दुरुस्तीच्या कामांना मान्यता देता आली नाही. सन २०१७-१८ करीता जिल्हा परिषद उपकरामधून रु.४० लक्ष निधी मंजूर करण्यात आला असून प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चौदाव्या वित्त्त आयोगाच्या निधी खर्चासंबंधी ग्रामपंचायतीनी तयार केलेला गाव विकास आराखडा अपलोड करण्याबाबत

**(२०) ९०६०१ (१८-०८-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौदाव्या वित्त्त आयोगाच्या निधी खर्चासंबंधी ग्रामपंचायतीनी तयार केलेला गाव विकास आराखडा ग्रामविकास विभागाने निर्देशित केलेल्या प्लान प्लस या ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करुन त्यात खर्चाची माहिती न टाकल्याने जिल्हाभरातील ३९४ ग्रामपंचायतीच्या चौदाव्या वित्त्त आयोगाच्या निधीच्या खर्चावर बंदी घालण्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास आराखडा अपलोड न केल्याने त्याचा दुष्यपरिणाम ३९४ ग्रामपंचायतीना झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार गाव विकास आराखडा अपलोड न करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०२-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्हा परिषदेच्या विविध योजनांचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(२१) ९१८८२ (१२-०८-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेच्या विविध योजनांचे ८० कोटी ४८ लाख रुपये अखर्चित राहिल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी मा.ग्रामविकास मंत्री, ग्रामविकास सचिव व विभागीय आयुक्तांकडेही तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

अकोला जिल्हा परिषदेच्या विविध योजनांचे सन २०१०-११ ते सन २०१५-१६ या कालावधीतील रु.६९ कोटी १२ लाख अखर्चित असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर अखर्चित निधीपैकी ऑक्टोबर, २०१७ अखेर रु.२७.६६ कोटी शासन खाती भरणा करण्यात आली आहे. उर्वरित अखर्चित निधी खर्च करण्यास वित्त विभागाच्या दिनांक २१.९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही चालू आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील यात्रेकरुना कैलास-मानसरोवर व अमरनाथ यात्रेकरिता अनुदान देण्याबाबत

**(२२) ९२२२८ (२१-०८-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कैलास-मानसरोवर व अमरनाथ यात्रेकरिता उत्तरप्रदेश सरकार एक लाख रुपये अनुदान देते त्याच धर्तीवर राज्यातील यात्रेकरुनाही कैलास-मानसरोवर व अमरनाथ यात्रेकरिता १ लाख रुपये तर वैष्णवदेवी यात्रेकरिता २५ हजार रुपये अनुदान देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार यात्रेकरुना यात्रासाठी अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०२-२०१८) :** (१), (२) व (३) कैलास मानसरोवराच्या यात्रेकरिता अर्थसहाय्य देण्याची मागणी प्राप्त झाली असून ती शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**सोनई (जि.अहमदनगर) पेठेतील रस्ता दुरुस्तीचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(२३) ९२६२३ (२२-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनई (जि.अहमदनगर) पेठेतील रस्ता दुरुस्तीचे काम संथगतीने सुरु असून पूर्वीचा रस्ता न खोदता नविन रस्त्यांची उंची वाढणार असल्याने परिसरातील घरे व दुकाने खाली गेल्याने यंदाच्या पावसाळयात घरात व दुकानांत पाणी शिरण्याचा धोका निर्माण होणार असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात जिल्हा परिषद अध्यक्ष यांनी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही, तथापि, सोनई येथील ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांच्याकडे गणेशवाडी हिंगोणी सोनई ग्रामीण मार्ग क्र. १२७ च्या सा.क्र. ४/०० ते ५/०० या लांबीतील रस्त्याच्या कामाबाबत तक्रार केली होती.

(३) तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेमार्फत चौकशी करण्यात आली असून मंजूर रस्त्याच्या लांबीपैकी ४/८०० ते ५/०० कि.मी. लांबी ही सोनई येथील जुन्या मुख्य बाजारपेठेमध्ये आहे. या २०० मीटर लांबीमध्ये अंदाजे ५० घरे व दुकाने आहेत. यापैकी ३ घरांना जोते (Plinth Height) अजिबात नसून ती घरे अस्तित्वातील जुन्या रस्त्याच्या जमीन पातळीत आहेत.

मंजूर अंदाजपत्रकामध्ये मजबुतीकरण, डांबरीकरण व बंद पाईप गटाराची तरतुद आहे. यामुळे रस्त्याची उंची फक्त १२.५० से.मी. ने वाढणार होती. त्यामुळे प्रत्यक्षात काम करतांना अस्तित्वातील रस्ता सुमारे ३० से.मी. खोदून काढण्यात आला. म्हणजेच जुन्या रस्त्याची पातळी नवीन काम पुर्ण झाल्यानंतर पुर्वीच्या पातळीपेक्षा सुमारे १७ से.मी. खाली गेलेली आहे. यापेक्षा जास्त पातळी कमी करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नव्हते.

मंजूर निविदेतील जलनिस्सारणाची सर्व कामे व्यवस्थित पूर्ण करुन घेण्यात आलेली आहेत. त्यामुळे पावसाळ्यात घरात व दुकानात पाणी शिरण्याचा धोका नाही.

तक्रार अर्जातील सर्व मुद्दयांच्या अनुषंगाने तांत्रिकदृष्ट्या सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. त्यामुळे तक्रारदाराचे समाधान झालेले असून त्यांनी तसे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचांदूर (जि.चंद्रपूर) नगर परिषदमध्ये तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांची नियमबाहय व अवैध भरती केल्याबाबत**

**(२४) ९२८९१ (२३-०८-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदूर (जि.चंद्रपूर) नगरपरिषदेमध्ये माहे जुलै, २०१४ मध्ये स्थापन झालेली तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांनी कर्मचाऱ्यांची नियमबाहय व अवैध भरती केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन झाले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.

ग्रामपंचायत कालावधीमध्ये झालेल्या कर्मचा-यांच्या नियुक्त्या हया ग्रामपंचायत ठरावाद्वारे करण्यात आलेल्या असून त्या नियमबाहय झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) सदर प्रकरणी शासनाकडून कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अडसरे बुद्रुक (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे मानव विकास कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी बांधकामात सरपंचानी केलेला अपहार**

**(२५) ९३०५३ (२२-०८-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानव विकास कार्यक्रमांतर्गत अडसरे बुद्रुक (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे अंगणवाडी बांधकामात सरपंचानी अपहार केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील वाडीव-हे येथील ४९ पात्र लाभार्थी मुलींना संस्थेच्या गैरजबाबदारपणामुळे निधी वितरित करता आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन्ही प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०२-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) अडसरे बु. ता. इगतपुरी येथील अंगणवाडी बांधकामाची चौकशी करुन संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांचे विरोधात घोटी पोलीस स्टेशन ता.इगतपुरी येथे दि. १०/३/२०१७ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस कार्यवाही सुरु आहे.

इगतपुरी तालुक्यातील वाडीव-हे येथे ४९ लाभार्थी मुलींच्या बँक खात्यावर मुलींना सायकल खरेदीसाठी संस्थाचालकांच्या आडमुठे धोरणामुळे आवश्यक निधी वर्ग न केल्याने लाभार्थी मुलींना मोफत सायकल वाटप योजनेचा लाभ मिळाला नसल्याचे चौकशी अहवालात आढळून आले होते. त्याबाबत अहवालातील शिफारशीनुसार सन २०१६-१७ पासूनचे शाळेचे वेतनेतर अनुदान बंद करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणातील दोषी मुख्याधापकांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशारितीने एक वर्षाकरिता बंद करण्याची शिक्षा देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्याबाबत संस्थेस लेखी कळविण्यात आले आहे. तसेच शाळेवर प्रशासक नेमण्याबाबत सखोल चौकशी सुरु आहे. तसेच दि. २७/५/२०१७ रोजी स्थानिक मान्यवरांच्या उपस्थितीत शाळेच्या ४९ विद्यार्थिनींना सायकल वाटप झालेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमलानाळा (ता.राजूरा, जि.चंद्रपूर) धरण परिसराचा विकास करण्याबाबत**

**(२६) ९३०८९ (१९-०८-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमलानाळा (ता.राजूरा, जि.चंद्रपूर) धरण परिसराला "क" वर्ग पर्यटन स्थळ घोषित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर परिसराला पर्यटन स्थळ घोषीत करण्यात आल्यानंतर स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरण परिसराचा विकास करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०२-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) 'क' पर्यटन स्थळी पर्यटकांसाठी सुविधाविषयक कामांसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आवश्यकतेनुसार निधी मंजूर करुन वितरीत केला जातो. त्यानुसार अमलनाळाचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

---

**उटावली (ता. विक्रमगड, जि.पालघर) ग्रामपंचायतीत झालेला गैरव्यवहार**

**(२७) ९३४६७ (२२-०८-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उटावली (ता.विक्रमगड, जि.पालघर) ग्रामपंचायत १४ वित्त आयोग व पेसा निधी गैरव्यवहारा प्रकरणी चौकशी सुरु होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणात दोषी असलेल्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०२-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) ग्रामपंचायत उटावली, ता.विक्रमगड येथील १४ वा वित्त आयोग व पेसा निधीच्या गैरव्यवहाराची चौकशी व्हावी म्हणुन तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीमध्ये करण्यात आलेल्या तपासणीस अनुसरुन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत उटावली यांना दिनांक ८.१.२०१७ च्या पत्रान्वये नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला होता. ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत उटावली यांनी दिनांक १५.२.२०१७ रोजी सादर केलेला खुलासा व त्यासोबतची कागदपत्रे यांची पडताळणी केली असता कुठल्याही प्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे संबंधित ग्रामविकास अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही कार्यवाही प्रस्तावित नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेलोरा (ता.चांदूरबाजार, जि.अमरावती) या 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रास एक कोटी रुपयांचा निधी मंजूर होवूनही कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) ९३९०४ (१९-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेलोरा (ता.चांदूरबाजार, जि.अमरावती) या 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रास एक कोटी रुपयांचा निधी मंजूर होवूनही दोन वर्षापासून कोणतेही काम सुरु न करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि काम तातडीने सुरु करावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे दिनांक ३० मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार तीर्थक्षेत्राचे प्रलंबित काम सुरु करण्यासह दोषीं अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१७-०२-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.

बेलोरा (ता.चांदूरबाजार, जि.अमरावती) या 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रास शासनाकडून सभागृह बांधकामासाठी रु. ६१.७८ लक्ष निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाचा कार्यारंभ आदेश दि. २.८.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत मंजूर सभागृहाचे स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) या पर्यटनस्थळाचा विकास महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत करण्याबाबत**

**(२९) ९४११२ (१९-०८-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) या पर्यटन स्थळाच्या विकास कामास निधी मंजूर करण्याबाबतच्या प्रस्तावास अंतिम मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती निधी मंजूर करुन देण्यात आला आहे,

(३) असल्यास, कोथळी पर्यटन स्थळाचा विकास तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०२-२०१८) :** (१) होय.

(२) दि.३०/११/२०१७ च्या शासन निर्णयाद्वारे रू.४९८.९० लक्ष एवढ्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून उर्वरित आवश्यक असलेला रू.३०० लक्ष निधी जिल्हाधिकारी,जळगाव यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मोझरी (जि.अमरावती) विकास आराखडयामध्ये वाढीव कामाचा समावेश करण्याबाबत**

**(३०) ९६३७६ (०६-०१-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मोझरी विकास आराखडयामध्ये नियोजत असलेल्या कामा व्यतिरिक्त वाढीव कामाचा समावेश करण्याबाबतचे प्रस्ताव, जिल्हाधिकारी, अमरावती, विभागीय आयुक्त, अमरावती व लोकप्रतिनिधीकडून शासनास प्राप्त झाले असून या वाढीव कामाकरीता ३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २९ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार प्रस्तावास तात्काळ मंजूरी देण्यासह वाढीव कामाकरीता निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नापणे (ता.वैभववाडी), सावडाव (ता.कणकवली) व आंबोली (ता.सावंतवाडी) आदी धबधब्याच्या ठिकाणी पर्यटन केंद्रे उभारण्याबाबत**

**(३१) ९७१९१ (२६-१२-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नापणे (ता.वैभववाडी), सावडाव (ता.कणकवली) व आंबोली (ता.सावंतवाडी) आदी बारमाही वाहणाऱ्या धबधब्याच्या ठिकाणी देशी-विदेशी पर्यटक मोठया प्रमाणात येत असल्याने सदरहू ठिकाणी पर्यटन केंद्र विनाविलंब विकसीत करण्यात यावेत अशी पर्यटकांची सातत्याची मागणी विचारात घेवून जिल्हयाच्या मा.पालकमंत्री यांनी सदरहू ठिकाणी पर्यटनदृष्ट्या विकसित करण्यासाठी २ कोटी रूपयांच्या निधीची घोषणा केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.पालकमंत्री यांनी २ कोटी रूपयांच्या निधीची तरतूद केल्याची घोषणा केल्यानंतरही अद्याप पर्यंत एकाही ठिकाणी पर्यटन केंद्रे उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नापणे, सावडाव व आंबोली या ठिकाणी पर्यटन केंद्रे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०२-२०१८) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे. नापणे सावडावसाठी रू.२.५० कोटींच्या कामांना मंजुरी देऊन रू.२ कोटी वितरीत केले आहेत. तसेच आंबोलीसाठी रू.१.९४ कोटींच्या कामांना मंजुरी देऊन रू.१.५५ कोटी वितरीत केले आहेत.

चांदा ते बांदा समितीने जिल्हस्तरीय यंत्रणांकडून/क्षेत्रीय यंत्रणांकडून तसेच क्षेत्रीय स्तरावरुन योग्य ती माहिती संकलीत करुन त्या आधारावर योजना/कामे अंतिम केलेली आहेत. नापणे, सावडाव व आंबोली याघटकांचे सविस्तर अंदाजपत्रक व जागा उपलब्ध करण्याबाबत कार्यवाही सुरु असून जिल्हास्तरीय यंत्राणांकडून जागा उपलब्ध झाल्यावर या घटकांचे कार्यान्वये करण्यात येणार आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तांबे-बांबळेवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) ह्या रस्त्यांचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(३२) ९७२४३ (२२-१२-२०१७). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तांबे ते बांबळेवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) रस्ता अत्यंत अरूंद असून त्याची दुरवस्था झाली असल्याने वाहतुकीअभावी स्थानिकांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तांबे ते बांबळेवाडी रस्त्याच्या नुतनीकरणासाठी रक्कम रूपये १६.०० लक्षाचे अंदाजपत्रक तयार करून एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्प घोडेगाव यांच्याकडे जिल्हा परिषदेमार्फत मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नुसार तांबे ते बांबळेवाडी रस्त्याच्या नुतनीकरणासाठी पाठविलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देवून रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रश्नांकित तांबे ते बांबळेवाडी ग्रामीण मार्ग क्र. ५५ असून या रस्त्याची लांबी २.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/४०० कि.मी. रस्ता डांबरी पृष्ठभागाचा असून वाहतुकीस योग्य आहे. त्यापुढील १/४०० ते २/०० कि.मी. लांबीचा रस्ता हा माती मुरमाचा गाडीवाट असून अरुंद आहे. या लांबीतील रस्ता सुधारण्याचे अंदाजपत्रक तयार करुन एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्प घोडेगाव यांना मार्च, २०१७ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आले आहे. त्यास अद्याप मंजूरी प्राप्त झालेली नाही.

तथापि सदर रस्त्याच्या सुधारणा करण्याच्या कामास जिल्हा नियोजन समिती-आदिवासी उपयोजनेअंतर्गत रु.२०.०० लक्ष किमतीस प्रशासकीय मंजूरी प्राप्त असून काम निविदा स्तरावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चाकण खांबेश्वरवाडी-रोहिदासवाडी (ता.पोलादपूर, जि.रायगड) या ९०० मीटर लांबीच्या वाडीजोड रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत**

**(३३) ९७२५५ (२२-१२-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे चाकण खांबेश्वरवाडी-रोहिदासवाडी (ता.पोलादपूर,जि.रायगड) या ९०० मीटर लांबीच्या वाडीजोड रस्त्याचे रुंदीकरणासह-मजबुतीकरण-डांबरीकरण करुन देण्यासाठी या भागातील ग्रामस्थांनी मा.ग्रामविकास मंत्री, जिल्हाधिकारी, रायगड यांना ऑगस्ट, २०१७ अखेर व तत्पूर्वीही वारंवार प्रत्यक्ष भेटून अर्ज निवेदने सादर करुनही सदर रस्त्याचे काम अद्यापी सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या रुंदीकरणासह-मजबुतीकरण-डांबरीकरणाच्या कामासाठी माहे ऑक्टोबर, २०१७ अखेर किती रुपयाचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे व त्यापैकी किती निधी आतापर्यंत खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) मौजे वाकण खांबेश्वरवाडी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.८३ असून सदर रस्त्याच्या ६०० मीटर लांबीच्या डांबरीकरणासाठी रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत रु.१०.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून रु. १०.०० लक्ष माहे एप्रिल, २०१७ मध्ये खर्च करण्यात आला आहे.
(३) उर्वरीत खांबेश्वरवाडी ते रोहिदासवाडी हा ३०० मीटरचा रस्ता योजनाबाह्य असल्याने ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत घेता येत नाही. त्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी सदर काम स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्रस्तावित करणे आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्ह्यातील आरे-वारे समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जीवरक्षकासह अद्यावत सुविधा देण्याबाबत

**(३४) ९७६०२ (२६-१२-२०१७). अ‍ॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील आरे-वारे समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जीवरक्षकसह अद्यावत सुविधांचा अभाव असून काही दिवसांपूर्वी याच ठिकाणी भरतीच्या पाण्यात फसलेल्या पाच पर्यटकांपैकी एकाचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वायरी समुद्रकिनारी झालेल्या दुर्घटनेनंतर जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाकडून ५० लाखांचा स्वतंत्र आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी व पर्यटनाच्या दृष्टीने जीवरक्षकासह अद्यावत सोयी सुविधा पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यता येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१७-०२-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) होय. रत्नागिरी जिल्ह्यातील आरे व वारे या दोन लगतच्या समुद्रकिनाऱ्यांपैकी आरे समुद्रकिनारी पोहावयास गेलेल्या ५ पर्यटकांपैकी एका पर्यटकाचा बुडून मृत्यू झालेला आहे.

(४) राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवरील (बीचेस) पर्यटकांच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत दि.८/९/२००६ च्या शासन निर्णयान्वये नियमावली तयार केलेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार उपाययोजना करावयाच्या निश्चित केलेल्या समुद्रकिनाऱ्यांपैकी (बीचेस) ग्रामीण भागातील समुद्रकिनाऱ्यांसाठी ग्रामविकास विभाग व शहरी/नागरी भागासाठी नगर विकास विभाग हे अंमलबजावणी यंत्रणा आहेत.

राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवरील (बीचेस) पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी करावयाच्या उपायायोजनांच्या अंमलबजावणीबाबत मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेच्या अनुषंगाने सन २०१६-२०१७ मध्ये पर्यटन विभागामार्फत रत्नागिरी जिल्ह्यातील निश्चित केलेल्या समुद्रकिनाऱ्यावरील (बीचेस) सुरक्षा व्यवस्थेसाठीच्या साधनसामग्रीकरिता रू.५३.८५ लक्ष व जीवरक्षक प्रशिक्षणासाठी रूपये ६.४६ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तर सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी साधनसामग्रीकरिता रू.४३.८५ लक्ष व जीवरक्ष प्रशिक्षणासाठी रू.६.४६ लक्ष उपलब्ध करुन दिले आहेत.

तसेच ग्रामविकास विभागाने सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रू.५५.०० लक्ष व रत्नागिरी जिल्ह्यासाठी रू.५४.०५ लक्ष रकमेचा निधी मंजूर केला आहे. तसेच निश्चित केलेल्या बीचवर जीवरक्षकांच्या मानधनाकरिता रू.१.४४ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्याने जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत रुपये १६६.६३ लक्ष निधी मंजूर केला आहे. निश्चित केलेल्या बीचेसवर माहिती फलक, दिशादर्शक फलक, धोक्याच्या सूचना देणारे फलक, आपत्कालीन प्रसंगी प्रथमोपचाराची माहिती देणारे फलक, धोक्याची सूचना देण्याकरिता सायरन, बीचेसवर प्रकाशवयवस्था, फ्लड लाईटस्, टेहळणी मनोरे (वॉच टॉवर्स) इत्यादी व्यवस्था केलेल्या आहेत.

राज्यातील समुद्र किनाऱ्यांवर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षा व्यवस्थेसंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.८९/२०१० दाखल असून ती न्यायप्रविष्ट आहे.

---

### मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे नवीन दुधलगाव ते रा.मा.क्र.६ या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३५) ९९३५० (०४-०१-२०१८). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे नवीन दुधलगाव ते रा.मा.क्र. ६ या रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरीकांची गैरसोयीचे होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची लांबी २ कि.मी. असून या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ४० लक्ष रु. च्या निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम, बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्ता दुरुस्ती करण्यासाठी निधी देवून रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रश्नांकित रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून मौ.नविन दुधलगाव ते रा.मा. क्र.६ हा ग्रामीण मार्ग क्र. १ दर्जाचा रस्ता असून त्याची एकूण लांबी २.१०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते २/०० कि.मी. लांबी जळगाव जिल्हयामध्ये येत असून या लांबीमधील खडीकरण व डांबरीकरण सार्वजनिक बांधकाम विभाग जळगांव यांच्यामार्फत करण्यात आले आहे. उर्वरीत १०० मीटर लांबी बुलडाणा जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असून सदर भाग हा नवे दुधलगांव गावातील अंतर्गत रस्ता आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम निधी व निकषाच्या अधिन राहून हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मलकापुर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे तेलखेड पोचमार्गाची झालेली दुरवस्था

**(३६) ९९३५२ (०४-०१-२०१८). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापुर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे तेलखेड पोचमार्गाची दुरवस्था झाल्याने नागरीकांची गैरसोयीचे होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची लांबी १ कि.मी. असून या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ३० लक्ष रु. च्या निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम, बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्ता दुरुस्त करण्यासाठी निधी देवून रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पहाणी करण्यात आली असून मौजे तेलखेड पोचमार्ग हा ग्रामीण मार्ग क्र. ५ असून या रस्त्याची एकूण लांबी १.३५० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०५०

ते ०/९५० कि.मी. लांबीतील खडीकरण व डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून उर्वरीत ०/९५० ते १/३५० कि.मी. या लांबीतील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१८-१९ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाचे अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे नरवेल ते कोटेश्वर मंदिर मार्गाची झालेली दुरवस्था**

**(३७) ९९३५४ (०४-०१-२०१८). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे नरवेल ते कोटेश्वर मंदिर या रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरीकांना गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची लांबी २ कि.मी. असून या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ६० लक्ष रु. च्या निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम, बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्ता दुरुस्त करण्यासाठी निधी देवून रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून नरवेल कोटेश्वर मंदीर हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ८ असून सदर रस्त्याची लांबी २.८०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते २/०० कि.मी. या लांबीतील खडीकरण व मजबुतीकरणाचे काम झालेले आहे. तसेच सा.क्र. २/०० ते २/३०० या लांबीमध्ये नळगंगा नदीवर एक पदरी मोठ्या पुलाचे बांधकाम पोच मार्गासह नाबार्ड योजनेअंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पुर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरीत २/३०० ते २/८०० कोटेश्वर मंदीरापर्यंत ५०० मीटर लांबीचा रस्ता बैलगाडीचा असून या रस्त्याचे मातीकाम खडीकरणाचे काम निधी व निकषाचे अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे भानगुरा ते दसरखेड या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३८) ९९४१७ (०४-०१-२०१८). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे भानगुरा ते दसरखेड या रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरीकांनागैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर रस्त्याची लांबी २ कि.मी. असून या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ५० लक्ष रु. च्या निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम, बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्ता दुरुस्त करण्यासाठी निधी देवून रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून मौजे.भानगुरा ते दसरखेड हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.९ असून या रस्त्याची एकूण लांबी ३.७०० कि.मी. आहे. त्यापैकी २/०० ते ३/७०० कि.मी. या लांबीमधील रस्त्याचे खडीकरणाचे काम सन २०१७-१८ मध्ये करण्यात आले असून रस्ता सुस्थितीत आहे. ०/०० ते २/०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक असून सन २०१८-१९ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सदर रस्त्याचे काम प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे दुधलगाव ते मोरखेड खुर्द या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३९) ९९४२० (०४-०१-२०१८). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे दुधलगाव ते मोरखेड खुर्द या रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरीकांना गैरसोय होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची लांबी ३ कि.मी. असून या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ३५ लक्ष रु. च्या निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्ता दुरुस्त करण्यासाठी निधी देवून रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून मौजे दुधलगाव ते मोरखडे खु. हा ग्रामीण मार्ग क्र.२५ असून त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/१०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे खडीकरण सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेले आहे. १/१०० ते २/०० कि.मी. हा एकूण ९०० मी.रस्ता बैलगाडीचा आहे. सदर रस्त्याचे मजबुतीकरण व संपूर्ण लांबीतील डांबरीकरणाचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे भाड्गणी ते वरखेड रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४०) ९९४२२ (२६-१२-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे भाड्गणी ते वरखेड रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरीकांना दळणवळण करण्यास गैरसोयीचे होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची लांबी ३ कि.मी. असून या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ३० लक्ष रु. च्या निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्ता दुरुस्त करण्यासाठी निधी देवून रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून मौजे भाडगणी ते वरखेड हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.२८ असून या रस्त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/३०० या लांबीमध्ये डांबरीकरण करण्यात आलेले आहे. उर्वरीत १/३०० ते ४/०० कि.मी. लांबीतील खडीनुतनीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील प्रजिमा. ९ ला जोडणारा धोंगर्डी पोच रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४१) ९९४२४ (२६-१२-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील प्रजिमा. ९ ला जोडणारा धोंगर्डी रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरीकांना दळणवळण करण्यास गैरसोयीचे होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची लांबी १.३० कि.मी. असून या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी २५ लक्ष रु, च्या निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्ता दुरुस्त करण्यासाठी निधी देवून रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) प्रजिमा ९ ला जोडणारा धोंगर्डी पोच रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.४० असून या रस्त्याची एकूण लांबी ३.२५० कि.मी. आहे. सदर रस्त्याचे खडीकरणाचे काम करण्यात आलेले असून ०/०० ते १/९०० कि.मी. लांबीमधील रस्ता क्षतीग्रस्त झाल्याने या लांबीमधील खडीनुतनीकरण व ०/०० ते ३/२५० कि.मी. लांबीमधील डांबरीकरणाचे काम उपलब्ध निधी व निकषाचे अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे तालसवाडा ते चिंचोल रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४२) ९९४२८ (२६-१२-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे तालसवाडा ते चिंचोल रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरीकांना दळणवळण करण्यास गैरसोयीचे होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची लांबी २ कि.मी. असून या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ५० लक्ष रु, च्या निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्ता दुरुस्त करण्यासाठी निधी देवून रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून मौजे तालसवाडा ते चिंचोल हा ग्रामीण मार्ग क्र.४ असून या रस्त्याची एकूण लांबी ६.२०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/०० कि.मी.या लांबीमधील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१६-१७ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. १/०० ते २/०० कि.मी. रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूर असून निविदा प्रक्रियेमध्ये आहे. ४/२०० ते ६/२०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आलेले असून सदर रस्ता सुस्थितीत आहे.
 २/२०० ते ४/२०० कि.मी. लांबीतील रस्ता खडीचा असून क्षतीग्रस्त आहे. सदर क्षतीग्रस्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. सदर काम उपलब्ध निधी व निकषाचे अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे लासुरा ते उमाळी रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४३) ९९४३१ (२६-१२-२०१७). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील मौजे लासुरा ते उमाळी रस्त्याची दुरवस्था झाल्याने तेथील नागरीकांना दळणवळण करण्यास गैरसोयीचे होत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची लांबी २ कि.मी. असून या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी ४० लक्ष रु, च्या निधीची आवश्यकता असून सदर रस्ता दुरुस्त करणे अत्यंत गरजेचे असल्याने सदर रस्ता दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार रस्ता दुरुस्त करण्यासाठी निधी देवून रस्ता तातडीने दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून मौजे लासुरा ते उमाळी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ३६ असून या रस्त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. आहे. संपूर्ण पृष्ठभाग खडीचा असून या रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत उपलब्ध निधी व निकषाच्या अधिन राहून प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पाचोरा (जि.जळगांव) तालुक्यात मुद्रा बँक लोन योजना अयशस्वी झाल्याबाबत

**(४४) १००७३३ (२६-१२-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाचोरा (जि.जळगांव) तालुक्यात बँक अधिका-यांच्या गैरवर्तणुकीमुळे मुद्रा बँक लोन योजना अयशस्वी झाल्याची माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार या योजनेसंदर्भात बँकाच्या दुर्लक्षाबाबत शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१८) :** (१) व (२) नाही.
जळगांव जिल्हयामध्ये सन २०१७-१८ मध्ये बँकांनी प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेंतर्गत समाधानकारक प्रमाणावर कर्ज वाटप केले आहे. जळगांव जिल्हयामध्ये प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेअंतर्गत दिनांक १०.११.२०१७ अखेर १,०७,१७९ इतकी कर्ज खातेधारकांची संख्या असून कर्ज मंजूरीच्या शिशु, किशोर व तरुण या तीन गटात एकूण रुपये ३५६.९४ कोटी इतकी रक्कम कर्जवाटपासाठी बँकांकडून मंजूर करण्यात आली असून त्यापैकी रुपये ३४६ कोटी इतके कर्ज प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेंतर्गत वितरीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कर्जोद-अहिरवाडी-मोहगण (ता.रावेर, जि.जळगाव) इजिमा-१७ या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४५) १०१३०८ (०४-०१-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जोद-अहिरवाडी-मोहगण (ता.रावेर, जि.जळगाव) इजिमा-१७ या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रश्नांकित कर्जोद अहिरवाडी मोहगण या इतर जिल्हा मार्ग क्र.१७ ची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून सदर रस्त्याची ४.९०० कि.मी लांबी आहे. रस्त्याचा संपूर्ण पृष्ठभाग डांबरी असून त्यापैकी १/८०० ते २/६०० कि.मी. व ३/९०० ते ४/९०० कि.मी. लांबीतील काही प्रमाणातील खड्डे वगळता रस्ता सुस्थितीत आहे. उर्वरीत लांबीची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

जिल्हा नियोजन विभागांतर्गत उपलब्ध निधीमधून २/६०० ते ३/६०० कि.मी लांबीचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेले असून उर्वरीत लांबीच्या दुरुस्तीची कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रावेर (जि.जळगाव) मतदार संघातील अट्रावल-सांगवी खु.-राजोरा (ता.यावल) इजिमा-१० या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(४६) १०१३१६ (२६-१२-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि.जळगाव) मतदारसंघातील अट्रावल-सांगवी खु.-राजोरा (ता.यावल) इजिमा-१० हा रस्ता वाहतुकीस अत्यंत खराब झालेला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले,
(२) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व त्यानुसार सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हा परिषदेमार्फत अट्रावल-सांगवी खु-राजोरा या इतर जिल्हा मार्ग क्र. १० रस्त्याची पाहणी करण्यात आली असून या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१७-१८ अंतर्गत ३०५४ २१३२ ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण कार्यक्रमामध्ये जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**फैजपूर ते कळमोदा (ता.यावल, जि.जळगाव) इजिमा-१३ या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४७) १०१३१७ (०४-०१-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फैजपूर ते कळमोदा (ता.यावल, जि.जळगाव) इजिमा-१० या रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रश्नांकित फैजपूर ते कळमोदा या इतर जिल्हा मार्ग क्र.१३ ची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून सदर रस्त्याची लांबी ५.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते २/०० कि.मी. लांबीचा डांबरी पृष्ठभाग पूर्णत:नष्ट झालेला आहे उर्वरीत २/०० ते ५/०० कि.मी. लांबीमध्ये खड्डे पडले आहेत.

जिल्हा नियोजन विभागांतर्गत उपलब्ध निधीमधून ०/०० ते १/०० कि.मी लांबीचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेले असून उर्वरीत लांबीच्या दुरुस्तीची कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील लव्हाळा-निनाईपरळे रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४८) १०१९७५ (०६-०१-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील लव्हाळा-निनाईपरळे रस्त्याला गेल्या २५ वर्षात डांबरीकरण करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरून आजूबाजूच्या चार ते पाच गावातील नागरिकांना गुडघाभर पाण्यातून ये-जा करावे लागते तसेच गावातील कडवी नदीवर मोठे धरण असल्यामुळे संबंधित विभागाच्या वाहनांची ये-जा सुरु असते त्यामुळे सदर रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार लव्हाळा-निनाईपरळे रस्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) प्रश्नांकित राष्ट्रीय महामार्ग क्र.२०४ पासून लव्हाळा परळे निनाई चौगुलेवाडी प्रजिमा क्र.२ ला मिळणारा इतर जिल्हा मार्ग क्र.१९४ या रस्त्याची एकूण लांबी १०.५० कि.मी. असून रस्त्याचा पृष्ठभाग खराब झालेला आहे.

सदर रस्ता हा शाहुवाडी तालुक्यातील डोंगरमाथा व अतिपावसाच्या विभागात येत असून या रस्त्यावरुन कडवी मध्यम प्रकल्प धरण विभागाची वाहने तसेच बॉक्साईड वाहतुकही सुरु असते. रस्ता दुरुस्तीसाठी रु.२५०.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे. जिल्हा नियोजन समितीच्या रस्ते दुरुस्ती यादीमध्ये अनुक्रमांक १५ वर सदर रस्त्याचा समावेश असून निधीच्या उपलब्धते नुसार काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जनधन योजनेच्या खात्याचे मोठया खात्यामध्ये रूपांतरीत करण्याबाबत**

**(४९) १०२०७० (२६-१२-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.कोल्हापूर) तालुक्यात ग्रामीण भागातील ब-याच नागरीकांनी प्रधान मंत्री आवास योजना/रमाई आवास योजना, इंदिरा आवास योजनेचे अनुदान मिळण्यासाठी पंचायत समिती स्तरावर जनधन योजनेच्या खात्याचे क्रमांक दिलेले आहेत परंतु सदर खात्यातुन ५० हजार रूपयापेक्षा जास्त रक्कम काढता येत नसल्यामूळे लाभार्थी अडचणीत सापडल्याने गटविकास विकास अधिकारी चिखली जिल्हा बुलढाणा यांनी प्रबंधक जिल्हा अग्रीणी बँक बुलढाणा यांच्याकडे जनधन योजनेतंर्गतच्या खात्याचा मोठया रक्कमेच्या खात्यात करण्यात यावा असे पत्र माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनधन योजने अंतर्गतचे खाते मोठ्या खात्यात रूपातंरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०२-२०१८) :** (१) व (२) नाही.

तथापि, अशा प्रकरणी यापूर्वी आवश्यक कागदपत्रांच्या पडताळणीअभावी उघडलेली जनधन योजनेंतर्गतची खाती लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तसेच KYC पूर्तता करुन सामान्य खात्यांमध्ये रुपांतरीत करण्याबाबतच्या सूचना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना तसेच जिल्हास्तरीय बँकर्स मिटींगमध्ये संबंधित बँकांना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील जाणा-या मार्गाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या लेखाशिर्षकाखाली निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(५०) १०२६७१ (०४-०१-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील जाणा-या मार्गाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या लेखाशिर्षकाखाली निधी उपलब्ध करुन द्यावा अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक १२ जुलै, २०१७ रोजीच्या पत्राव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार उक्त रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१८) :** (१) अशा प्रकारचे पत्र प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते.

सन २०१७-१८ मध्ये रस्ते व पुल दुरुस्ती कार्यक्रम लेखाशिर्ष ३०५४-२४१९ अंतर्गत सोलापूर जिल्ह्यासाठी रु.५०३.३६ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तसेच सन २०१७-१८ मध्ये जिल्हा वार्षिक योजना, रस्ते व पूल दुरुस्ती अंतर्गत करमाळा तालुक्यासाठी रु. २.१० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.